पुण्य नगरी

# फिल्मसिटीत लघु चित्रपटाचे धडे



**मुंबई :** तरुणाईसह नागरिकांना कायम उत्कंठा असलेल्या चित्रपटसृष्टीतील चित्रपटाच्या निर्मितीचे धडे डॉ. मिलिंद दामले यांनी उपस्थितांना दिले.

पुणे येथील फिल्म अ‍ॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) व दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी) यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यात लघुपट व चित्रपटाच्या निर्मितीतील विविध टप्पे, चित्रपट साकारण्यातील कलाकार, इतर तंत्रज्ञ व कर्मचाऱ्यांची भूमिका विशद करण्यात आली. कथांमधील फरक, स्क्रिप्ट म्हणजे काय, पुस्तकाची कथा व सिनेमाची कथा आदींमधील फरक विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. पटकथा, कथा, संवाद आणि स्क्रिप्ट यांमधील फरक डॉ. दामले यांनी सविस्तरपणे सांगितले.

गाण्याचे चित्रीकरण, सेट तयार करण्याची पद्धत, वेगवेगळ्या ठिकाणांहून चित्रपटासाठी एकत्र काम करणारे कलाकार, इनडोअर व आऊटडोअर पद्धतीत करावयाचे काम, प्रॉडक्शन, प्री प्रॉडक्शन आणि पोस्ट प्रॉडक्शन यांतील फरक समजावून सांगितले.

साऊंड डिझाइन, साऊंड रेकॉर्डिंग, मिक्सिंग, रेकॉर्डिंग, रीरेकॉर्डिंग, एडिटिंग, असेंब्ली आदी प्रकाराची माहिती दिली. तसेच चित्रपटाचा कमांडिंग चीफ, त्याचे कार्य यांची उदाहरणांसह माहिती दिली. लघुकथा, लघु पटकथा, लघु चित्रपट, पूर्ण लांबीचा चित्रपट आदींमधील फरकांबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या वेळी पुरुषोत्तम बेर्डे उपस्थित होते.

Mumbai Edition
Feb 15, 2026 Page No. 06
Powered by: erelego.com

ठाणे वार्ता
बातमी तीच, जी सत्य असेल!

# ‘फिल्मसिटी’त लघु चित्रपटाचे धडे



तरुणाईसह नागरिकांना कायम उत्कंठा असलेल्या चित्रपटसृष्टीतील चित्रपटाच्या निर्मितीचे धडे डॉ. मिलिंद दामले यांनी उपस्थितांना दिले.

पुणे येथील `फिल्म अ‍ॅण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (एफटीआयआय) व दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी) यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आलली होती. त्यात लघुपट व चित्रपटाच्या निर्मितीतील विविध टप्पे, चित्रपट साकारण्यातील कलाकार, इतर तंत्रज्ञ व कर्मचाऱ्यांची भूमिका विषद करण्यात आली. कथांमधील फरक, संक्रिप्ट म्हणजे काय, पुस्तकाची कथा व सिनेमाची कथा आदींमधील फरक विद्यार्थ्यांना सागण्यात आले. पटकथा, कथा, संवाद आणि संक्रिप्ट यामधील फरक डॉ. दामले यांनी सविस्तरपणे सांगितला. गाण्याचे चित्रीकरण, सेट तयार करण्याची पद्धत, वेगवेगळ्या ठिकाणांहून चित्रपटासाठी एकत्र काम करणारे कलाकार, इनडोअर व आउटडोअर पद्धतीत करावयाचे काम, प्रॉडक्शन, प्री प्रॉडक्शन आणि पोस्ट प्रॉडक्शन यातील फरक समजावून सांगितला.

साऊंड डिझाईन, साऊंड रेकॉर्डींग, मिक्सींग, रेकॉर्डींग, रिरेकॉर्डींग, एडीटींग, असेंब्ली आदी प्रकाराची माहिती दिली. तसेच चित्रपटाचा कमांडींग चीफ, त्याचे कार्य यांची उदाहरणांसह माहिती दिली. लघुकथा, लघु पटकथा, लघु चित्रपट, पूर्ण लांबीचा चित्रपट आदींमधील फरकाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी पुरुषोत्तम बेर्डे उपस्थित होते.

February 11, 2026 | Page no: 2 | Thane
Powerd by - Amol Surve | 9869329948

# चित्रनगरीमध्ये लघुचित्रपटाचे धडे



मुंबई : चित्रनगरीमध्ये लघुचित्रपट निर्मितीवर आधारित कार्यशाळा पार पडली.

मुंबई, ता. १० : चित्रपटसृष्टीच्या निर्मिती प्रक्रियेबाबत जाणून घेण्याची उत्सुकता असलेल्या तरुणाईसह नागरिकांसाठी दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी) येथे लघुचित्रपट निर्मितीवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत चित्रपट निर्मितीतील विविध टप्प्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

पुणे येथील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली होती. चित्रपट अभ्यासक डॉ. मिलिंद दामले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी लघुपट तसेच पूर्ण लांबीच्या चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या कलाकार, तंत्रज्ञ आणि इतर कर्मचाऱ्यांच्या भूमिकांवर प्रकाश टाकण्यात आला. कथा, पटकथा, संवाद आणि स्क्रिप्ट यामधील फरक स्पष्ट करण्यात आला. पुस्तकातील कथा आणि चित्रपटातील कथनशैली यातील भिन्नता, तसेच कथाविकासाची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. चित्रपट निर्मितीतील कामकाज, सेट उभारणी, गाण्यांचे चित्रीकरण यांची माहिती देण्यात आली. कार्यशाळेत सहभागी झालेल्या उपस्थितांना सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

पुढारी

संक्षिप्त



# फिल्मसिटीत लघु चित्रपट निर्मिती कार्यशाळेला नागरिकांचा प्रतिसाद

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

तरुणाईसह नागरिकांना कायम उत्कंठा असलेल्या चित्रपटसृष्टीतील चित्रपटाच्या निर्मितीचे धडे आज (मंगळवारी) मुंबईतील फिल्मसिटीमध्ये कार्यशाळेत डॉ. मिलिंद दामले यांनी उपस्थितांना दिले. पुणे येथील फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया व दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्या संयुक्त विद्यमाने गोरेगाव चित्रनगरी चित्रांगण सभागृहात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यात लघुपट व चित्रपटाच्या निर्मितीतील विविध टप्पे, चित्रपट साकारण्यातील कलाकार, इतर तंत्रज्ञ व कर्मचाऱ्यांची भूमिका विषद करण्यात आली. कथांमधील फरक, स्क्रिप्ट म्हणजे काय, पुस्तकाची कथा व सिनेमाची कथा आदींमधील फरक विद्यार्थ्यांना सागण्यात आले. पटकथा, कथा, संवाद आणि स्क्रिप्ट यामधील फरक डॉ. दामले यांनी सविस्तरपणे सांगितला. गाण्याचे चित्रीकरण, सेट तयार करण्याची पद्धत, इनडोअर व आउटडोअर पद्धतीत करावयाचे काम, प्रॉडक्शन, प्री प्रॉडक्शन आणि पोस्ट प्रॉडक्शन यातील फरक समजावून सांगितला. साऊंड डिझाईन, साऊंड रेकॉर्डीग, मिक्सींग, रेकॉर्डीग, रिरेकॉर्डीग, एडीटींग, असेंब्ली आदी प्रकाराची माहिती दिली. तसेच लघुकथा, लघु पटकथा, लघु चित्रपट, पूर्ण लांबीचा चित्रपट आदींमधील फरकाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी पुरुषोत्तम बेर्डे उपस्थित होते.